नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १६/१०/२०२६ (शुक्रवार )

---

## ९.८८ कोटींची सायबर फसवणुक करणारी आंतरराज्यीय टोळी निष्पन्न
## वकिलासह ६ आरोपींना अटक; ४.२१ कोटी रुपये हस्तगत
## नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन वडोदा:— पोलीस स्टेशन वडोदा हद्दीतील एका पीडित व्यक्तीच्या बँक खात्याशी त्यांचा मोबाईल क्रमांक नोंदणीकृत होता. दिनांक ०४/०७/२०२६ ते ०६/०७/२०२६ या कालावधीत पीडित व्यक्तीने कोणतीही लिंक डाउनलोड न करता किंवा कोणालाही ओ.टी.पी. न देता, अज्ञात आरोपींनी त्यांच्या बँक खात्यातून आरटीजीएसद्वारे एकूण ९,८८,८३,९९९/— रुपये (नऊ कोटी अठ्ठ्याऐंशी लाख त्र्याऐंशी हजार नऊशे नव्याण्णव रुपये) ऑनलाइन काढून फसवणूक केली. पीडित व्यक्तीकडून कोणतीही माहिती न घेता व्यवहार झाल्याने या गुन्हयात सिम स्वॅपिंगचा वापर झालेला असण्याची शक्यता असून या दिशेने तपास सुरू आहे.

फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित व्यक्तीने तात्काळ सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण येथे ऑनलाइन तक्रार दाखल केली. त्यानंतर त्यांच्या तोंडी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन वडोदा येथे अप. क्र. २२७/२०२६, कलम ३१८(४), ३(५), ६१(२), २३८, २३९, ३१७(४) भारतीय न्याय संहिता सह कलम ६६(ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये दिनांक ०८/०७/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. पीडित व्यक्तीने वेळीच तक्रार नोंदविल्यामुळे फसवणूक झालेल्या रकमेपैकी ४,२०,६१,१६२/— रुपये (सुमारे ४.२१ कोटी रुपये) होल्ड करून हस्तगत (**Recover**) करण्यात यश आले आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री शशांत एम एम ,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, सायबर पोलीस स्टेशन व पोलीस स्टेशन वडोदा यांनी संयुक्तपणे तपास केला. सायबर पोलीस स्टेशन द्वारे संशयित बँक खाती व फिनटेक कंपन्यांच्या खात्यांची तांत्रिक पद्धतीने पडताळणी करण्यात आली. आरोपींचा शोध घेण्यासाठी दिल्ली, मुंबई व उत्तर प्रदेश

येथील विविध ठिकाणी पोलीस पथके पाठविण्यात आली. या कारवाईत उत्तरप्रदेश, झारखंड, दिल्ली व मुंबई येथून १) हनुमान कुमार खखनु राम , वय २६ वर्षे, रा. गाजीपूर, उत्तरप्रदेश, २) रविकुमार रामवृक्ष यादव , वय २४ वर्षे, रा. शिवनी, उत्तरप्रदेश , ३) अजीम रफिक मिठाणी , वय २६ वर्षे, रा. मुंबई, ४) मुकेशकुमार शामशंकर मिश्रा ,वय ४१ वर्षे, रा. मीरा रोड, जि. ठाणे, राकेश सैलेश सिंह , वय ४४ वर्षे, रा. बनियाडीह, पलामू, जि. राँची, झारखंड आणि आरोपी क्र ६) अंकुर अशोककुमार गोस्वामी , वय ३० वर्षे, रा. नंदग्राम, जि. गाझियाबाद, उ.प्र. अशा सहा आरोपींना सदर प्रकरणी अटक करण्यात आली आहे.

तपासात असे निष्पन्न झाले आहे की, आरोपींनी डाटाशा प्रायव्हेट लिमिटेड, श्री फिनटेक, रॅक्टोव्हर प्रायव्हेट लिमिटेड अशा अनेक कंपन्या स्थापन करून तसेच म्युल अकाउंट्सचा वापर करून विविध सायबर फसवणुकीतील मोठ्या रकमांचे व्यवहार केले आहेत. गुन्ह्यात ऑर्गनाईज्ड लेयरिंग व मोठ्या प्रमाणावर मनी लॉन्डरिंग झाल्याचे दिसून येते. काही आरोपींनी यापूर्वी सुमारे ६ ते ७ वर्षे बँकिंग क्षेत्रात काम केले असून काही आरोपी सन २०२४ मध्ये रेनेट टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत कार्यरत होते. या कंपनींविरुद्ध इंदौर येथे सुमारे ३,४०० कोटी रुपयांच्या आर्थिक फसवणुकीचा गुन्हा नोंद आहे. बँकिंग प्रणालीच्या ज्ञानाचा वापर करून आरोपींनी गुन्हयाची आखणी केल्याचे दिसून येते.

आरोपींनी विविध फायनान्शियल सर्व्हिसेस कंपन्या व पेमेंट गेटवेचा वापर करून फसवणुकीची रक्कम पेआऊटद्वारे वळविली व नंतर ती रोख स्वरूपात काढून हवाला मार्गाने हस्तांतरित केली. फसवणुकीतील रक्कम लेयरिंगद्वारे १,००० पेक्षा अधिक बँक खात्यांमध्ये वळविण्यात येऊन पुढे पेआऊटसाठी विविध फिनटेक कंपन्यांमार्फत फिरविण्यात आली. तसेच विविध खात्यांमध्ये रक्कम हस्तांतरित करून व लेयरिंग करून मुंबई व उत्तरप्रदेशातील विविध ठिकाणी सोन्याची खरेदी केल्याचे निष्पन्न झाले आहे. गुन्ह्यातील आरोपी उत्तरप्रदेश, झारखंड, दिल्ली व मुंबई येथील असून गुन्ह्याचे जाळे अनेक राज्यांत पसरलेले आहे.

अटक आरोपींपैकी मुकेशकुमार शामशंकर मिश्रा हा मुंबई व दिल्ली उच्च न्यायालयात वकिली करणारा अधिवक्ता असून तो सायबर गुन्ह्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये काम करीत असे. त्याने इतर आरोपींना या फसवणुकीसाठी मार्गदर्शन करून दिशा दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्याची मुंबईस्थित ”लॉमॅटिक्स“ ही विधी संस्था आहे. तसेच मुंबई व दिल्ली येथील अंगडिया व हवाला मार्गांची भूमिका तपासाधीन असून याबाबत सखोल चौकशी सुरू आहे.

सदर गुन्ह्यात फॉरेन्सिक, डिजिटल व आर्थिक लेखापरीक्षण (**Financial Audit**) सुरू आहे. तसेच अनेक फिनटेक कंपन्यांमधील खाती व म्युल वॉलेट्सचीही सखोल तपासणी सुरू आहे. गुन्ह्याचे स्वरूप व आर्थिक व्याप्ती लक्षात घेता अंमलबजावणी संचालनालयाशी (**ED**) समन्वय साधण्यात येत आहे. प्राथमिक लेखापरीक्षणात (**Primary Audit**) विविध बँक खाती आढळून आली असून ती इतर पीडितांची असण्याची शक्यता आहे. त्यामुळे आरोपींनी इतर नागरिकांचीही फसवणूक केली असण्याची शक्यता असून त्या दिशेने शोध घेण्यात येत आहे. हस्तगत करण्यात आलेली रक्कम पीडित व्यक्तीच्या खात्यात ट्रान्सफर करण्याची कार्यवाही सुरू असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

सायबर धोक्यांपासून जनतेने सावध राहावे. कोणत्याही अनोळखी व्यक्तीला ओ.टी.पी., बँक तपशील किंवा लिंकद्वारे आपल्या मोबाईल/खात्यात प्रवेश देऊ नये. सायबर फसवणूक झाल्यास, तसेच या आरोपींकडून फसवणूक झालेल्या इतर नागरिकांनी त्वरित सायबर पोलीस स्टेशन किंवा नजीकच्या पोलीस स्टेशनला माहिती द्यावी, किंवा सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांनी नागरिकांना केले आहे

## अवैधरित्या मुरूमाची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, १ कोटी २५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, ६ आरोपी अटक वडोदा पोलीस यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री शशांत एम एम ,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा पोलीस निरीक्षक श्री मनोज गदादे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वडोदा यांच्या नेतृत्वात वडोदा पोलीसांनी दिनांक १५/१०/२०२६ रोजी मुरूमाची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई करून १,००,२५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

दिनांक १५/०७/२०२६ रोजी वडोदा पोलीस रात्रगस्त करीत असतांना पोलीसांना पहाटे ०४ वाजेच्या दरम्यान पेट्रोलिंग दरम्यान नागपूर ते भंडारा हायवे वर मौजा गुंमथळा शिवारात ०५ ट्रक संशयित रित्या उभे दिसले. पोलीसांनी सदर वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये गौण खनिज मुरूम दिसून आले. सदर मुरूमाबाबत रॉयल्टी व इतर कागदपत्र ची तपासणी केली असता नमुद चालकांकडे कोणत्याही प्रकारचा परवाना अथवा रॉयल्टी मिळून आली नाही. सदर वाहन चालक अवैध्यरित्या विनापरवाना मुरूम वाहतुक करीत असतांना मिळुन आले. .

पोलीसांनी पंचासमक्ष १) अशोक लेलँड ट्रक क्र. एमएच ४० सीडी ०८४४ किंमती २०,००,०००/— रूपये, २) अशोक लेलँड ट्रक क्र. एमएच ४० सीडी ४९४४ किंमत अंदाजे २०,००,०००/—रूपये, ३) अशोक लेलँड ट्रक क्र. एमएच ४० सीडी ९२६४ किंमत अंदाजे २०,००,०००/— रूपये,४) अशोक लेलँड ट्रक क्र. एमएच ४० सीडी ९२९४ — किंमत अंदाजे २०,००,०००/— रूपये, ५) टाटा ट्रक क्र. एमएच ४९ बीझेड ९९४४ किंमती

२०,००,०००/— रूपये, आणि एकूण २५ ब्रास मुरूम २५०००/— रूपये असा **एकूण १,००,२५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

सदर प्रकरणी **ट्रक चालक आरोपी** क्रं. १) मनोज अंतराम नेताम ,वय ३०वर्षे, रा. निबाळकर खदान पांचगाव, ता. कुही, जि. नागपूर ,२) रवीकांत गोवर्धन चव्हाण, वय ४० वर्षे, रा. नागेश्वर नगर बिडगाव, ता. कामठी, जि. नागपूर ,३) राजेश दयाराम भोंडे, वय ४६ वर्षे, रा. भिमवाडी शंभर मंदिर जवळ पिली नदी कामठी रोड नागपूर, जि. नागपूर,४) आनंदराव भीमराव मानकर, वय ४४ वर्षे, रा. बिबा फरीद नगर ढोबळे ले आऊंट झिंगाबाई टाकळी नागपूर, जि. नागपूर, ५) विष्णू दयाराम नेताम ,वय ३५ वर्षे, रा. निबाळकर खदान पांचगाव, ता. कुही, जि. नागपूर आणि ६) **ट्रक मालक आरोपी** अरविंद वसंतराव राऊत ,वय ५४ वर्षे, रा. न्यू सुभेदार ले आऊंट नागपूर, जि. नागपूर यांच्या विरूध्द कलम ३०३ (२),३(५) सहकलम ४७(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ सहकलम ४,२१ खान आणि खनिजे अधिनियम १९५७ सह कलम ३, ४ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **नमुद ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे.**



# अवैधरीत्या गांजाची लागवड करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, २ आरोपी अटक
# नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड :—** **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव ,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड, पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, पोउपनि श्री प्रविण भिमटे यांच्या नेतृत्वात अंमली पदार्थ विरोधी पथकाने ,स्थानिक गुन्हे शाखा आणि उमरेड पोलीसांनी दिनांक १५/१०/२०२६ रोजी उमरेड पोलीस स्टेशन हद्दीत मौजा डवा येथे अवैधरीत्या गांजाची लागवड करणाऱ्या आरोपीतांविरूध्द संयुक्त कारवाई करून २४ गांजाच्या झाडासह २७,२६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

दिनांक १५ /१० /२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक हे उमरेड परिसरात पेट्रोलिंग करत असताना त्यांना खात्रीशिर गोपनीय माहिती मिळाली की, पोस्टे उमरेड हद्दीत डवा या गावात इसम नामे १)अरुण कन्हैया कुहीकर याने त्याच्या राहत्या घराच्या मागील भागात गांजाच्या झाडाची लागवड केलेली आहे तसेच २) उत्तम नथ्थुजी राऊत यानी त्याच्या शेतात गांजाच्या झाडाची लागवड केली आहे .मिळालेल्या माहीतीच्या आधारे अंमली पदार्थ विरोधी पथकाने ,स्थानिक गुन्हे शाखा आणि उमरेड पोलीस यांच्या संयुक्त कारवाई करत सदर घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी क्र १) अरुण कन्हैया कुहिकर, वय ५० वर्षे, यांच्या घराच्या मागील भागात चार गांजाची झाडे आणि आरोपी क्रमांक २) उत्तम नथुजी राऊत, वय ४० वर्षे रा. यांच्या शेतातून २० लहान मोठी गांजाची झाडे मिळून आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष एकुण २४ अंमली पदार्थ गांजाची झाडे वजन १.३१३ ग्रॅम किंमती २६२६०/— आणि एक मोबाईल किंमती १०००/— रूपये असा एकुण २७२६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द कलम ८(ब), २०(आय), २२(ब) एनडीपीएस कायदयान्वये गुन्हा नोदं करून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.**





## घरफोडीचा १ आणि दुचाकी चोरीचे २ गुन्हे असे ३ गुन्हे उघड, ३ आरोपी अटक,२ लाख ३२ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा यांची कामगिरी

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांच्या नेतृत्वात दिनांक १५/१०/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने .घरफोडीचा १ आणि दुचाकी चोरीचे २ गुन्हे असे एकुण ३ गुन्हे उघड करून २,३२,४७७/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उघड न झालेल्या गुन्हयांचा समांतर तपास करीत असतांना त्यांना गोपनिया माहीती प्राप्त झाली की, आरोपी क्रिश रामचरित जायसवाल ,रा,संताजी नगर कन्हान आणि त्याचे साथीदारांनी पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत घरफोडीचा तसेच मौदा हद्दीत दुचाकी चोरीचा गुन्हा केला आहे. अशी खात्रीशिर माहीती प्राप्त होताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक पुराव्याचे विश्लेषन करून दिनांक १५/१०/२०२६ रोजी नमुद आरोपी क्रं **१) क्रिश रामचरित जायसवाल , वय २१ वर्ष रा,संताजी नगर कन्हान याला त्याचे साथीदार आरोपी क्रं २) गणेश भाऊराव पुरी, वय १९ वर्ष, रा, पिली हवेली चौकी, कामठी आणि आरोपी क्रं ३) मन अशोक चवरे वय २१ वर्ष, अमर नगर हिंगना, नागपुर** यांना कन्हान यांच्यासह जुने कन्हान नदीचे पुलाजवळुन ताब्यात घेतले. नमुद आरोपींना कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी मिळुन पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत घरफोडीचा गुन्हा, पोलीस स्टेशन मौदा हद्दीत दुचाकी चोरी तसेच भंडारा येथील जवाहर नगर पोलीस स्टेशन येथे दुचाकी चोरीचा गुन्हा केल्याची माहीती दिली.

पोलीसांनी आरोपींच्या ताब्यातुन पंचासमक्ष १) पिवळया व पांढऱ्या धातुचा ऐवज २) मौदा येथील गुन्हयात चोरी गेलेली मोपेड क्रमांक एम एच ४० /सी एफ़ ५८४४ कीमती ८०, ०००/— ,३) मौदा येथील गुन्हयात चोरी गेलेली बजाज पल्सर क्रमांक एम एच ३६/डब्लू ५४२३ कीमती १,००,०००/— रूपये असा **एकुण २,३२,४७७/— रूपयांचा** च्या मुद्देमाल जप्त करण्यात आला.तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

उघड गुन्हे

१.पोस्टे कन्हान अप. क्र. ७१०/२०२६, कलम ३३१(३)३३१(४), ३०५(अ) भान्यासं

२.पोस्टे मौदा अप. क्र. ६७५/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं

३.पोस्टे जवाहर नगर ,जि भंडारा अप. क्र. ४३१/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं



## अंमली पदर्थ गांजा ची विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद, कोंढाळी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक १५/१०/२०२६ रोजी कोंढाळी पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, **वार्ड क्र. २, बाजारगाव झोपडपट्टी येथे एक महीला** अंमली पदार्थ गांजा बाळगुन गांजाची विक्री करत आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी पोहचुन नमुद महीला आरोपीच्या घराची झडती घेतली असता आरोपीच्या घरी हिरव्या रंगाच्या वनस्पती सदृश्य सुखलेली पाने फुले बिया बोंडे असलेला गांजा सदृश **अंमली पदार्थ मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष ४२२ ग्रॅम गांजा एकुण किंमत ५,०००/— रूपये असा मुद्देमाल जप्त केला आला आहे. नमुद प्रकरणी महीला आरोपी विरूद्ध पोलीस स्टेशन कोंढाळी येथे कलम ८(क),२०(ब) (पप)एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे**

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक १५/१०/२०२६ रोजी सावनेर पोलीस रात्रगस्त करीत असता आरोपी अतुल लक्ष्मण साबळे, वय ३२ वर्ष, रा. वार्ड क्र ४ वाकीपुरा, पाटणसांवगी ता सावनेर हा मौजा पाटणसांवगी एसबीआय चौक येथे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आला. पोलीसांनी त्याला विचारपुसक केली असता त्यांनी असमाधान कारक उत्तर दिले. नमुद आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यावर एन.डी.पी.एस कायदयान्वये १३ गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १५/१०/२०२६ रोजी विविध पोलीस स्टेशन येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कन्हान** अंतर्गत आरोपी नामे कुणाल गौतम नंदेश्वर, वय ३० वर्ष, रा. संताजी नगर ,कन्हान हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी अरुण शिवलाल उईके, वय २६ वर्ष, रा. ग्वारी माल पोस्ट पाथरी, ता. बिछवा, जि छिंदवाडा हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत आरोपी १. अशोक सुर्दशन चौव्हान, वय ४७ वर्ष, रा. वार्ड क्र १३, हुडको कॉलनी, झोपडपट्टी जि. नागपुर ,२. चंदु देवाजी गोरखेडे, वय ४६ वर्ष, रा. वार्ड क्र १२ इंदीरा नगर ब्राहमणी कळमेश्वर आणि क्र ३. पुनाराम धनराज क्षिरसागर वय ५५ वर्ष, रा. वार्ड क्र १२ हनुमान मंदीर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन आरोली** अंतर्गत आरोपी विजय फैजु नेवारे, रा. खापरखेडा तेली, ता. मौदा जि. नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन पारशिवणी** अंतर्गत आरोपी क्रं १ राहुल अरूण डोंगरे, वय २९ वर्ष, रा. जुना बसस्टाप पारशिवनी, ता. पारशिवनी आणि क्र २ विकास सुरेंद्र कठाणे वय २२ वर्ष रा. वार्ड क्र ०३, पारशिवनी त. पारशिवनी जि. नागपूर आणि क्र. ३ प्रशांत राजेश शरणागत, वय २३ वर्ष, रा. प्रभाग क्र. १२, पारशिवनी तह. पारशिवनी जिल्हा नागपुर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन रामटेक** अंतर्गत आरोपी क्रं १ रविंद्र शेखर फुलझले, वय २८ वर्षे रा. कैची माईन, मनसर ता.रामटेक जि.नागपूर आणि क्रं २ रितेश दिगांबर धमगये, वय ३९ वर्षे रा. आंबेडकर वार्ड रामटेक जि.नागपूर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन बोरी** अंतर्गत आरोपी शंकर कुमार बुटन मुखया, वय ३१ वर्ष, रा. रायपुर सेक्टर १२६ नोयडा, जि.

गौतमबुदध नगर उ.प्र. ह.मु. भारकस, ता. हिंगणा, जि. नागपूर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन बेला** अंतर्गत रामगोपाल मायाबाबा मोरधरे, वय ४३ वर्ष, रा. खूर्सापार, ता. उमरेड, जि. नागपूर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२६ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२६ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत खालील पोलीस स्टेशन अंतर्गत खालील प्रमाणे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन पाचगाव** :– पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पाचगाव यांनी पोलीस स्टेशन पाचगाव चांपा समशेर नगर दुर्गादेवी मंडळ येथे तसेच सालई गोधनी ग्रामपंचायत कार्यालय येथे सायबर जनजागृती कार्यक्रम घेवुन मार्गदर्शन केले.

**पोलीस स्टेशन पारिशवणी** :– सहा पोलीस निरीक्षक श्रीमत धनश्री कुटेमाटे,पोलीस स्टेशन पारशिवणी यांनी पोलीस स्टेशन दुर्गा मंडळ येथे भेट देवुन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला.

**पोलीस स्टेशन कुही** :– पोलीस निरीक्षक श्री प्रशांत काळे , पोलीस स्टेशन वेलतुर यांनी नुतन हायस्कुल कुही येथे भेट देवुन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला.

**पोलीस स्टेशन वडोदा** :– पोलीस उप निरीक्षक श्रीमती संघमित्र बांबोळे ,पोलीस स्टेशन वडोदा यांनी सनमार्क प्रायव्हेट लिमिटेड येथे भेट देवुन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला.

**सदर कार्यक्रमामध्ये सायबर जनजागृती व्हिडीओ दाखविण्यात आले. सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल, आर्थिक फसवणूक, फसवे कॉल व संदेश यापासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक, ओटीपी, बनावट नोकरीच्या जाहिराती पासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. मॉर्फिंग ,फिशींग, डिजिटल अरेस्ट, ट्रेडींग फसवणुक, तसेच डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहीती देवुन सायबर जनजागृती करण्यात आली.**

## म्यूल अकाउंटद्वारे होणाऱ्या सायबर फसवणुकीबाबत जनजागृती

नागरिकांनी अनोळखी व्यक्तींना स्वतःचे बँक खाते, ATM कार्ड, पासबुक किंवा इंटरनेट बँकिंगची माहिती वापरण्यास देऊ नये. तसेच, कमिशनच्या आमिषाने अनोळखी व्यक्तींची रक्कम स्वतःच्या खात्यात स्वीकारून इतर खात्यांत हस्तांतरित करू नये. अशा व्यवहारांमुळे नागरिक सायबर गुन्ह्यांच्या तपासात अडकण्याची व कायदेशीर कारवाईला सामोरे जाण्याची शक्यता असते, याबाबत जनजागृती करण्यात आली.

## पेन्शन धारकांसोबत होणाऱ्या सायबर फसवणुकीबाबत जनजागृती

सायबर गुन्हेगारांकडून पेन्शनधारकांना पेन्शन सुरू ठेवणे, जीवन प्रमाणपत्र (स्पमि ब्मतजपपिबंजम) जमा करणे, झ्ल्ब अद्ययावत करणे किंवा पेन्शनची थकबाकी मिळवून देण्याच्या बहाण्याने फोन केले जातात. बँक अधिकारी किंवा शासकीय कर्मचारी असल्याचे भासवून त्यांच्याकडून बँक खात्याची माहिती, **ATM PIN, OTP** व इतर गोपनीय माहिती मिळवून आर्थिक फसवणूक केली जाते.याबाबत जेष्ठ नागरिकांना जनजागृती करण्यात आली.

सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ ’सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा **cybercrime.gov.in** या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.

नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये आणि सायबर फसवणूक झाल्यास विलंब न हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.








विशाल मार्ट
वैशाली सेंटर
माणक किराणा

# अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ११ गुन्हे दाखल,

**दिनांक १५/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ११ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन खापा** येथे शैलेश धनराज बोरकर, वय ३० वर्ष, रा. वाकी, ता. सावनेर जि नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मोहपा** येथे आरोपी नामे अजय सुधाकर टाके, वय ४५ वर्ष, रा. सोनेगाव, ता. कळमेश्वर, जि नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी प्रभाकर झिंगर मोहीनकर, रा. गांगापुर आणि सुनिल बालकदास राजपुत, रा. गरडापार यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन मौदा** येथे चक्रधर बबन धामने वय, ३८ वर्ष, रा. चिरव्हा ता मौदा याचेवर ०१ गुन्हा नोंद . **पोलीस स्टेशन काटोल येथे** महीला आरोपी हीचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे **आरोपी क्र १** अक्षय प्रशांत गजबे, वय ३१ वर्ष, वार्ड क्रमांक ०३ मोवाड ता नरखेड जी नागपूर आणि २. अक्षय शामराव बनाईत वय २९वर्ष रा. वार्ड क्र . ०९ मोवाड ता नरखेड जी नागपूर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन अरोली** येथे मोहनमुरली पुनमचंद शिंगाडे रा. कोदामेंढी ता. मौदा जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद .**पोलीस स्टेशन बोरी** येथे **क्र १** आझादसिंग हरभजनसिंग बावरी, वय २३ वर्षे, रा. रूईखैरी, ता. जि. नागपुर आणि नवसु गोपाला महाजन वय ३२ वर्षे रा धवळपेठ, ता. हिंगणा, जि नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ९४५० मिली देशी दारू, २७ लीटर मोहाफुल दारू, ३००लिटर सडवा असा एकुण २५,४००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर